मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# उद्योगनगरीला पाणीटंचाईच्या झळा!

## उन्हाचा कडाका वाढल्याने भूजलपातळी घटली; नागरिकांकडून पाण्याची मागणी वाढली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

तापमानाचा पारा वाढला आहे, विंधन विहिरींनी तळ गाठला आहे, त्यामुळे पाण्याची मागणी वाढली आहे. मात्र, महापालिकेकडून दिवसाआड असूनही अपुरा व कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. मागणी वाढल्याने टँकरच्या फेऱ्या वाढल्या असून मालकांनी दरही वाढवल्याने आर्थिक आणि कमी पाणी अशा दुहेरी कोंडीत नागरिक अडकले आहेत.



शहराला पवना आणि आंद्रा धरणातून पाणीपुरवठा होत आहे. पवना धरणातील पाणी रावेत येथील पवना नदीवरील बंधाऱ्यातून उचलले जाते. तेथून जलवाहिनीद्वारे निगडी प्राधिकरण सेक्टर २३ मधील जलशुद्धीकरण केंद्रात प्रक्रिया करून वितरित केले जाते. आंद्रा धरणातील पाणी इंद्रायणी नदीतून निघोजे बंधाऱ्यातून उचलून चिखली जलशुद्धीकरण केंद्राद्वारे वितरित केले जाते.

मात्र, दोन्ही जलशुद्धीकरण केंद्रातून होणारा पाणीपुरवठा २५ नोव्हेंबर २०१९ पासून दिवसाआड सुरू आहे. समन्याय पद्धतीने व पुरेशा दाबाने पाणी वितरण व्हावे यासाठी दिवसाआड पाणीपुरवठ्याचा निर्णय तत्कालीन महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी घेतला होता. त्यात अद्याप सुधारणा झालेली नाही.

### महापालिकेची भूमिका

» शहरातील पिण्याच्या पाण्याची मागणी पूर्ण करणे आणि सांडपाण्यामुळे होणारे नदी प्रदूषण रोखण्यासाठी महापालिकेने सांडपाण्याचे पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर करण्याचा प्रकल्प हाती घेतलाहे. यामध्ये शेती व औद्योगिक वापरासाठी १०० दशलक्ष लिटर क्षणता व निवासी भागातील अप्रत्यक्ष पिण्याव्यतिरिक्त वापरासाठी १० दशलक्ष लिटर क्षमतेचे प्रक्रिया प्रकल्प उभारणा आहे. पाणी गळती व चोरीचे प्रमाण ४० टक्क्यांपर्यंत असल्याने अनधिकृत नळजोड शोधले जात आहेत. प्रत्येक अनधिकृत नळजोड अधिकृत केला जात आहे. प्रत्येक नळाला पाणीमीटर बसविण्यात येत आहे.

### पाण्याचे स्रोत

» पवना नदीतून दररोज ५१० एमएलडी (दशलक्ष लिटर) अशुद्ध जलउपसा
» औद्योगिक विकास महामंडळाकून (एमआयडीसी) दररोज ३० एमएलडी
» आंद्रा धरणातून दररोज १०० एमएलडी, मात्र, प्रत्यक्षात ७० एमएलडीपर्यंत

---

# रामकृष्ण मोरे नाट्यगृहाचा कायापालट

## शिस्तबद्ध कारभारामुळे कलाकार आणि रसिक सुखावले

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराची सांस्कृतिक ओळख असलेल्या चिंचवड येथील 'प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहा'ने गेल्या वर्षभरात कात टाकली आहे. पूर्वीच्या विस्कळीत व्यवस्थापनाला छेद देत, व्यवस्थापक विकास वेताळ यांनी सध्या येथील कारभार अत्यंत शिस्तबद्ध आणि पारदर्शक पद्धतीने सुरू ठेवला आहे ठेवला आहे. त्यामुळे कलाकार, आयोजक, प्रेषक आणि ज्येष्ठ नागरिक यांच्याकडून समाधान व्यक्त केले जात आहे.



### सर्वसामान्यांचा विचार

» नाट्यगृहात येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष खबरदारी घेतली जात असून, त्यांना सन्मानाची वागणूक आणि आवश्यक सोयी सुविधा पुरवण्यावर भर दिला जात आहे. एकूणच, रामकृष्ण मोरे नाट्यगृह आता केवळ एक वास्तू न राहता, उत्तम प्रशासनाचे केंद्र बनले आहे, ज्यामुळे शहराच्या सांस्कृतिक वैभवात मोलाची भर पडत आहे.

### मनमानी कारभाराला लगाम

» काही काळापूर्वी नाट्यगृहाच्या व्यवस्थापनात काही अंशी मनमानी कारभार पाहायला मिळत होता. विशेषतः कर्मचारी एकाच जागी अनेक वर्षे ठाण मांडून असल्याने कामकाजात अडथळे येत होते. मात्र, गेल्या वर्षभरापासून प्रशासनाने कडक नियमावली लागू केली आहे. कर्मचाऱ्यांच्या बदल्या आणि कामाचे सुसूत्रीकरण केल्यामुळे आता पूर्णपणे व्यावसायिक आणि नियमांनुसार कामकाज चालत आहे. याचा थेट सकारात्मक परिणाम नाट्यगृहाच्या दैनंदिन कामकाजावर दिसून येत आहे.

### उत्पन्नात वाढ आणि कार्यक्रमांची रेलचेल

» प्रशासनाने आखून दिलेल्या नवीन नियमावलीमुळे केवळ शिस्तच आली नाही, तर नाट्यगृहाच्या उत्पन्नातही मोठी भर पडली आहे. भाड्याची रक्कम आणि इतर शुल्काचा भरणा आता वेळेवर आणि नियमित होत आहे. विशेष म्हणजे, येथील सोयीसुविधा आणि चांगल्या वातावरणामुळे नाटकांच्या प्रयोगांमध्ये आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. कलाकारांना मिळणारी वागणूक आणि तांत्रिक सहकार्य सुधारल्याने त्यांनीही या बदलाचे स्वागत केले आहे.

# पुणे – हैदराबाद हायस्पीड रेल्वे कॉरिडोरची अलाईनमेंट बदला..!

## खासदार श्रीरंग बारणे यांची लोकसभेत मागणी, धार्मिक भावना व पर्यावरणाचे रक्षण होण्यासाठी अलाईनमेंट बदलवावी.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे–हैदराबाद हायस्पीड रेल्वे कॉरिडोर या प्रकल्पाचा मार्ग संत तुकाराम महाराजांचे पवित्र स्थळ असलेल्या भंडारा डोंगराखालून जात आहे. त्यामुळे या मार्गात बदल करावा. धार्मिक भावना व पर्यावरणाचे रक्षण होण्यासाठी रेल्वे मार्गाची अलाईनमेंट बदलवावी. पुणे ते लोणावळा मार्गावर दुपारच्या वेळेत लोकल रेल्वे सुरु करावी. पुणे–लोणावळा तिसरा व चौथा रेल्वे मार्गिकेसाठी राज्य सरकारने ५ हजार १०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. केंद्र सरकारनेही यास गती देण्यासह राज्यातील विविध रेल्वेच्या प्रश्नांकडे खासदार श्रीरंग बारणे यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.




रेल्वेच्या २०१६-२७ च्या अर्थसंकल्पावर शिवसेना पक्षाच्या वतीने खासदार श्रीरंग बारणे यांनी चर्चेत सहभाग घेतला. त्यांनी मावळ लोकसभा मतदारसंघ तसेच महाराष्ट्राशी संबंधित विविध रेल्वे विषयक महत्त्वाचे प्रश्न मांडले. वाढत्या प्रवासी संख्येचा आणि औद्योगिक तसेच पर्यटन क्षेत्राच्या गरजांचा विचार करता महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांना अधिक गती देण्याची मागणी खासदार बारणे यांनी केली. खासदार बारणे म्हणाले, देशात चार हजार किलोमीटर हाय स्पीड कॉरिडोर बनविण्याची तयारी सुरु आहे. मुंबई, पुणे, हैद्राबाद आणि बंगळुरु या प्रमुख आर्थिक शहराला हा कॉरिडोर जोडणार आहे. यामुळे रेल्वेची नवीन आणि आधुनिक क्रांती होईल. मुंबई परिसरात जागा नसल्याने भुयारी किंवा ओव्हर राईड रेल्वे करण्याची गरज आहे. पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या लोणावळा स्थानकावर मुंबई–पुणे 'वंदे भारत' एक्सप्रेसला थांबा द्यावा.

पुणे ते लोणावळा मार्गावर दुपारच्या वेळेत लोकल रेल्वे सुरु करावी. पुणे–लोणावळा तिसरा व चौथा रेल्वे मार्गिकेसाठी राज्य सरकारने ५ हजार १०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. केंद्र सरकारनेही यास गती दिल्यास लाखो प्रवाशांचा प्रवास अधिक सुरक्षित व सुलभ होईल. 'अमृत भारत स्टेशन' योजनेअंतर्गत चिंचवड, आकुर्डी, देहूरोड, तळेगाव, लोणावळा आणि पनवेल स्थानकांच्या पुनर्विकास केला आहे. कर्जत स्थानक राहिले आहे. कर्जत स्थानकाचाही समावेश करावा. कर्जत रेल्वे स्टेशन तयार होत आहे.

मावळ लोकसभा मतदारसंघ रायगडपर्यंत विस्तारला आहे. श्री संत तुकाराम महाराजांची पावन भूमी देहूगाव आणि संत ज्ञानेश्वर महाराजांची तपोवन भूमी आळंदीत वर्षभरात लाखो वारकरी येतात. पंढरपूर, देहू आणि आळंदी या पवित्र स्थळांपर्यंत रेल्वे कनेक्टिव्हिटी अधिक सक्षम करण्याबरोबरच वारकऱ्यांसाठी विशेष गाड्यांची सोय करण्यात यावी. रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण करावे. ही तीर्थस्थळे भक्तीची केंद्रे आहेत. चार ज्योतिर्लिंग महाराष्ट्रात आहेत. कोल्हापूर ते पुण्यापर्यंत धावणारी सह्याद्री एक्सप्रेस मुंबईपर्यंत सुरु करावी. महाराष्ट्रातील प्रवासी, उद्योग आणि पर्यटन क्षेत्राला चालना देणारे प्रकल्प वेगाने पूर्ण व्हावेत. लोणावळ्यात पर्यटक मोठ्या संख्येने येतात. त्यांच्यासाठी सुविधा करावी. रेल्वे विभागाच्या जागेवर झालेल्या झोपड्यांवर एसआरए योजना लागू करावी. झोपडीत राहणाऱ्या लोकांना हक्काचे घर मिळेल, असेही खासदार बारणे म्हणाले.

# गॅस सिलिंडर पुरवठा मुबलक, विरोधकांच्या अफवांवर विश्वास ठेवू नका : आमदार शंकर जगताप

## आमदार शंकर जगताप यांनी तातडीने प्रशासकीय यंत्रणा हलवून अन्नपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत महत्त्वाची बैठक घेतली

**पिंपरी | प्रतिनिधी**

आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शहरात गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाल्याच्या वावड्या उठल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर आमदार शंकर जगताप यांनी तातडीने प्रशासकीय यंत्रणा हलवून अन्नपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत महत्त्वाची बैठक घेतली. "शहरात गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असून पुरवठा सुरळीत आहे, त्यामुळे नागरिकांनी विरोधकांच्या कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये," असे आवाहन आमदार जगताप यांनी केले आहे.



> **आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे पिंपरी चिंचवड शहरात गॅस सिलेंडरचा तुटवडा निर्माण झाल्याच्या चर्चा केवळ अफवा आहेत. अन्नपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन सद्यस्थितीचा आढावा घेतला असून, शहरात गॅस सिलेंडरचा साठा मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. प्रशासनाला काळाबाजार रोखण्यासाठी कडक सूचना दिल्या आहेत. नागरिकांनी विरोधकांच्या कोणत्याही अफवांना बळी पडू नये आणि अनावश्यक साठवणूक करून घाबरून जाऊ नये. आपला गॅस पुरवठा पूर्णतः सुरळीत आहे.".**
>
> **- शंकर जगताप, आमदार, पिंपरी चिंचवड शहर**

### प्रशासनाकडून स्पष्टीकरण

**» यावेळी अन्नपुरवठा अधिकारी विजयकुमार क्षीरसागर यांनी माहिती दिली की, शासनाने आखून दिलेल्या गाईडलाईननुसार पुरवठा सुरू आहे. गॅसचा काळाबाजार रोखण्यासाठी विशेष 'गस्त पथके' तैनात करण्यात आली असून ठिकठिकाणी अचानक तपासणी केली जात आहे. घरगुती वापराच्या सिलिंडरचे वितरण योग्य पद्धतीने होत आहे की नाही, यावर प्रशासनाचे बारीक लक्ष आहे. शहरात गॅस सिलेंडरचा कोणताही तुटवडा नसल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.**

गेल्या काही दिवसांपासून शहरात गॅस टंचाई असल्याच्या चर्चांमुळे गॅस एजन्सीबाहेर नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळत होते. काही ठिकाणी गॅस मिळत नसल्याच्या तक्रारी वाढल्याने शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून आमदार शंकर जगताप यांनी अन्न पुरवठा परिमंडळ अधिकारी विजयकुमार क्षीरसागर व अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीने बैठक बोलावली.

गॅसचा काळाबाजार रोखण्यासाठी विशेष 'गस्त पथके' तैनात करण्यात आली असून ठिकठिकाणी अचानक तपासणी केली जात आहे. घरगुती वापराच्या सिलिंडरचे वितरण योग्य पद्धतीने होत आहे की नाही, यावर प्रशासनाचे बारीक लक्ष आहे. शहरात गॅस सिलेंडरचा कोणताही तुटवडा नसल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

या बैठकीत आमदारांनी शहरातील गॅस पुरवठ्याची सद्यस्थिती, साठवणूक आणि वितरण व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेतला. "नागरिकांना रांगेत उभे राहावे लागत असेल किंवा गॅसचा काळाबाजार होत असेल, तर ते खपवून घेतले जाणार नाही," अशा कडक सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या. गॅस सिलिंडरचा तुटवडा भासणार नाही याची खात्री करून घेण्यासाठी त्यांनी अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली.

# वाहतूक कोंडी फोडण्यासाठी मेट्रोचे 200 किलोमीटरचे जाळे

## पुण्याचा कायापालट होणार! शहरात 200 किलोमीटर मेट्रोचे जाळे विणणार; मुख्यमंत्री फडणवीसांची मोठी घोषणा

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीत येत्या काही वर्षांत दोनशे किलोमीटर लांबीचे मेट्रो मार्गांचे जाळे उभारण्यात येणार असून, त्या संदर्भात नियोजन सुरू आहे,' अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी दिली. 'नागरी विकासाचा विचार करून 'महामेट्रो' आणि नगरविकास विभागाने मेट्रोचे जाळे उभारण्याचे नियोजन करावे. त्यासाठी आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करून दिला जाईल,' असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

पुणे मेट्रो प्रकल्पाचे प्रशासकीय मुख्यालय असलेल्या 'मेट्रो भवन'चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रविवारी झाले. त्या वेळी ते बोलत होते. महापौर मंजूषा नागपूरे, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री सुनेत्रा पवार, उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी, आमदार भीमराव तापकीर, हेमंत रासने, योगेश टिळेकर, बापू पठारे यांच्यासह नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, 'महामेट्रो'चे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर या वेळी उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले, 'शहरात ३३ किलोमीटरचा मेट्रो मार्ग कार्यान्वित झाला आहे. याशिवाय, पुणे महागनर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मेट्रो मार्गाचे कामही अंतिम टप्प्यात आहे. या दोन्ही प्रकल्पांमुळे मेट्रोचे जाळे ५६ किलोमीटरपर्यंत पोहोचणार आहे. याशिवाय, नव्याने ५५ किलोमीटरचे काम सुरू असून, ८० किलोमीटरचा मार्ग प्रस्तावित आहे. भविष्यात पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीए क्षेत्राचा समावेश असलेल्या दोनशे किलोमीटर लांबीचे मेट्रोचे जाळे विकसित केले जाईल.'

शहराचा झपाट्याने होणारा विकास लक्षात घेता या दोनशे किलोमीटर लांबीचे जाळे करण्यासाठीचे नियोजन तातडीने पूर्ण करावेत. या सर्व मार्गांचे सविस्त प्रकल्प आराखडे एकत्रितपणे तयार करावेत. भविष्यातील ग्रोथ सेंटर, नवीन विमानतळ, औद्योगिक क्षेत्रे आणि वाढती उपनगरे यांचा विचार मेट्रोचे जाळे विकसित करताना करावा,' अशी सूचनाही फडणवीस यांनी केली.



### मेट्रो भवनाच्या सुविधा

» नवीन मेट्रो भवन सुमारे ८,१५० चौरस मीटर क्षेत्रफळावर उभारण्यात आले आहे. या इमारतीत अनुभव केंद्र, पुणे मेट्रो प्रकल्पाचे मॉडेल्स, ३१२ आसनक्षमतेचे सभागृह तसेच बॅकअप ऑपरेशन कंट्रोल सेंटरची सुविधा आहे. याशिवाय सिग्नलिंग व दूरसंचार प्रणाली, नैसर्गिक प्रकाशाचा वापर आणि ऊर्जा कार्यक्षम रचना यामुळे ही इमारत पर्यावरणपूरक बनविण्यात आली आहे. आधुनिक पुण्याच्या प्रगतीचे हे प्रतीक असल्याचे मत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केले.

### २०० किमी मेट्रो जाळ्याचे लक्ष्य

» पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) हद्दीत येत्या काही वर्षांत सुमारे २०० किलोमीटर लांबीचे मेट्रो जाळे उभारण्याचे नियोजन सुरू असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. शहरातील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी हा महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यातील वाढती लोकसंख्या, नवीन विमानतळ, औद्योगिक क्षेत्रे आणि उपनगरांचा विकास लक्षात घेऊन मेट्रो मार्गांचे नियोजन करण्यात येणार आहे.

### मेट्रो भवनाचे उद्घाटन

» पुणे मेट्रो प्रकल्पाचे प्रशासकीय मुख्यालय असलेल्या 'मेट्रो भवन'चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री मा धुरी मिसाळ तसेच महा मेट्रोचे चव्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर उपस्थित होते. सध्या शहरात ३३ किमी मेट्रो मार्ग सुरू असून, इतर प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर हे जाळे ५६ किमीपर्यंत वाढणार आहे.

# महापालिकेची 20 रुग्णालये 'जनआरोग्य' योजनेत; पुणेकरांना कॅशलेस उपचारांची सुविधा

## पुणे महापालिकेचा निर्णय; महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना आणि प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा समावेश

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा मोफत मिळावी, यासाठी महापालिका प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. महापालिकेची 20 रुग्णालये आणि 47 बाह्यरुग्ण विभाग महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजना आणि प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेमध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे

भारतरत्न राजीव गांधी रुग्णालय, डॉ. नायडू संसर्गजन्य रोग रुग्णालय, कै. जयाबाई नानासाहेब सुतार प्रसूतिगृह, राजमाता जिजाऊ प्रसूतिगृह, डॉ. कोटणीस आरोग्य केंद्र, औंध कुटी रुग्णालय तसेच कै. मालती काची प्रसूतिगृह आदी रुग्णालये आणि दवाखान्यांचा समावेश करण्यात येणार आहे. राज्य आरोग्य विभागाच्या शिफारशीनुसार हा निर्णय घेण्यात आला आहे.

यासंदर्भात महापालिकेत राज्य आरोग्य विभागाचे अधिकारी आणि महापालिका प्रशासन यांची बैठक झाली. या बैठकीत लाभार्थ्यांची नोंदणी, उपचारांसाठी मंजुरी प्रक्रिया आणि रुग्णनोंदणीसाठी आवश्यक असलेल्या तांत्रिक बाबी व कार्यपद्धती यांचा आढावा घेण्यात आला. महापालिका सध्या प्राथमिक आरोग्यसेवा मोफत किंवा अल्पदरात उपलब्ध करून देते. मात्र, अनेक वैद्यकीय सेवा पीपीपी तत्त्वावर चालविल्या जात असल्याने रुग्णांना त्यासाठी स्वतःच्या खिशातून खर्च करावा लागतो.

महापालिकेची 20 रुग्णालये आणि 47 बाह्यरुग्ण विभाग महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजना आणि प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेमध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे आता रुग्णालये योजनेत समाविष्ट झाल्यावर नागरिकांना कॅशलेस उपचारांची सुविधा मिळणार आहे. खासगी रुग्णालयांमधील महागड्या उपचारांमुळे अनेक कुटुंबे उपचार पुढे ढकलतात. महापालिकेच्या अधिकाधिक रुग्णालयांचा योजनेत समावेश झाल्याने नागरिकांना घराजवळ मोफत किंवा अनुदानित उपचार मिळू शकतील. महापालिका प्रशासनाने लवकरच आवश्यक तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करून लाभार्थ्यांची नोंदणी सुरू करण्याची तयारी सुरू केली आहे.




> महापालिकेची रुग्णालये आणि दवाखाने योजनेअंतर्गत समाविष्ट झाल्यास नागरिकांना दिलासा मिळणार आहे. यामुळे शहरातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला बळकटी मिळेल.
> - डॉ. सूर्यकांत देवकर, सहायक आरोग्य अधिकारी, पुणे महापालिका

# शिवाजीनगर आणि पेठ परिसरात 'लो एमिशन झोन'चा प्रस्ताव

## जितेंद्र दुडी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक; पुणे महानगरपालिका आणि तज्ज्ञ संस्थांकडून प्रदूषण नियंत्रणासाठी आराखडा

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरातील वाढत्या वायू प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी शिवाजीनगर व पेठ परिसरात 'लो एमिशन झोन' (कमी प्रदूषण क्षेत्र) लागू करण्याबाबत प्रशासनाकडून विचारमंथन सुरू आहे. या क्षेत्रात जास्त प्रदूषण करणाऱ्या वाहनांना प्रवेशासाठी विशेष प्रदूषण शुल्क आकारण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

नुकतीच जिल्हाधिकारी कार्यालयात विविध तज्ञ संस्था आणि संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीस जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, पुणे महानगरपालिकेचे मुख्य अभियंता अनिरुद्ध पावसकर यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी व वाहतूक नियोजन क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित होते.

पुणे शहरातील वायू प्रदूषणाचे प्रमुख कारण वाहने असल्याचे विविध अभ्यासांमधून स्पष्ट झाले आहे. २०२० मध्ये झालेल्या अभ्यासानुसार पुणे महानगर परिसरातील एकूण सूक्ष्म कण (पीएम २.५) प्रदूषणापैकी सुमारे ४६ टक्के प्रदूषण वाहनांमुळे होत असल्याचे आढळून आले आहे. हे सूक्ष्म कण मानवी आरोग्यास अत्यंत घातक ठरतात.

तसेच २०२३ मध्ये करण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील पेट्रोल, डिझेल व सीएनजीवर चालणाऱ्या सुमारे ७० टक्के वाहनांमध्ये 'भारत स्टेज-४' किंवा त्यापेक्षा जुने इंजिन तंत्रज्ञान असल्याचे दिसून आले आहे. केंद्र शासनाने वाहनांमधून होणाऱ्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी 'भारत स्टेज' उत्सर्जन मानके लागू केली असून सध्या 'भारत स्टेज-६' हे तुलनेने सर्वात कमी प्रदूषण करणारे इंजिन तंत्रज्ञान मानले जाते.

अभ्यासानुसार २००० पूर्वी नोंदणी झालेली एक कार जवळपास ११ आधुनिक 'भारत स्टेज-६' कारइतके प्रदूषण करते, तर जुन्या तंत्रज्ञानाच्या एका ट्रकमुळे सुमारे १४ आधुनिक ट्रकांइतके प्रदूषण होते. तसेच 'भारत स्टेज-६' डिझेल कारमधून होणारे सूक्ष्म कणांचे उत्सर्जन 'भारत स्टेज-३' डिझेल कारपेक्षा सुमारे ९० टक्के कमी असल्याचेही नमूद करण्यात आले.



### जुनी वाहने व शुल्काची शक्यता

» प्रस्तावानुसार 'भारत स्टेज-३' किंवा त्यापेक्षा जुन्या इंजिन तंत्रज्ञानाच्या वाहनांना या क्षेत्रात प्रवेशासाठी दररोज प्रदूषण शुल्क आकारले जाऊ शकते. शुल्क न भरता प्रवेश करणाऱ्या वाहनांवर कॅमेऱ्यांच्या मदतीने दंडात्मक कारवाई करण्याचा प्रस्ताव आहे. पुढील टप्प्यात ही अट 'भारत स्टेज-४' वाहनांवरही लागू करण्याचा तसेच लो एमिशन झोनचा विस्तार शहरातील इतर भागांमध्ये करण्याचा विचार सुरू आहे. यासोबत सार्वजनिक वाहतूक वाढवणे, पदपथ सुधारणा आणि पर्यायी वाहतूक प्रोत्साहन यांसारख्या उपाययोजनांवरही प्रशासनाचा भर असेल.

### वाहनांमुळे सर्वाधिक प्रदूषण

» विविध अभ्यासांनुसार पुणे शहरातील वायू प्रदूषणाचे प्रमुख कारण वाहने असल्याचे स्पष्ट झाले आहे. २०२० मधील अभ्यासानुसार पुणे महानगर परिसरातील पीएम २.५ सूक्ष्म कणांपैकी सुमारे ४६ टक्के प्रदूषण वाहनांमुळे होते. २०२३ च्या सर्वेक्षणानुसार पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील सुमारे ७० टक्के वाहने 'भारत स्टेज-४' किंवा त्यापेक्षा जुन्या इंजिन तंत्रज्ञानाची आहेत. 'भारत स्टेज-६' तंत्रज्ञानाच्या वाहनांमधून तुलनेने खूपच कमी प्रदूषण होते.

### कमी प्रदूषण क्षेत्राचा प्रस्ताव

» पुण्यातील वाढत्या वायू प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी शिवाजीनगर आणि शहरातील पेठ भागात 'लो एमिशन झोन' (कमी प्रदूषण क्षेत्र) लागू करण्याचा प्रस्ताव प्रशासनाच्या विचाराधीन आहे. या क्षेत्रात जास्त प्रदूषण करणाऱ्या वाहनांना प्रवेशासाठी विशेष प्रदूषण शुल्क आकारण्याचा विचार सुरू आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी जितेंद्र दुडी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. बैठकीला नवल किशोर राम आणि मुख्य अभियंता अनिरुद्ध पावसकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# भीमाशंकर मंदिर भाविकांसाठी बंद, दुबे यांच्यासाठी मात्र खुले?

## मंदिर बंद असतानाही खासदार निशिकांत दुबे यांनी दर्शन घेतल्याने वाद.

**पुणे | प्रतिनिधी**


वादग्रस्त विधानांमुळे चर्चेत असणारे भारतीय जनता पक्षाचे खासदार डॉ. निशिकांत दुबे यांच्या भीमाशंकर मंदिर दर्शनाने नवा वाद निर्माण झाला आहे. बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले भीमाशंकर मंदिर दुरुस्तीच्या कामांमुळे भाविकांसाठी बंद असताना खासदारांसाठी मंदिराचे दरवाजे खुले करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला. दरम्यान, 'दर्शनासाठी कोणतीही परवानगी दिली नव्हती.

भीमाशंकर मंदिर ट्रस्टच्या व्यक्तीकडून परवानगी दिली असेल तर, त्याची माहिती घेतली जाईल,' असे या वादावर जिल्हा प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले. भीमाशंकर मंदिर गेल्या काही दिवसांपासून भाविकांसाठी बंद आहे. नाशिक येथील कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर येथे भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन मंदिर परिसरातील कामे वेगाने सुरू करण्यात आली आहेत.

मात्र, झारखंड येथील गोड्डा लोकसभा मतदारसंघाचे आमदार निशिकांत दुबे यांना शनिवारी 'व्हीआयपी' दर्शन देण्यात आले. त्या संदर्भात समाजमाध्यमातूनही तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. सभामंडप आणि पायरी मार्गाच्या बांधकामांमुळे सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून ९ जानेवारीपासून मंदिर तीन महिन्यांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी घेतला होता.

गेल्या महिन्यात महाशिवरात्र असतानाही मंदिर भाविकांसाठी बंद ठेवले होते. तसेच, यात्राही रद्द करण्यात आली होती. मात्र, सर्वसामान्य भाविकांना एक न्याय आणि व्हीआयपींना वेगळा न्याय का देण्यात आला, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.दरम्यान, 'खासदार दुबे आणि त्यांचे सहकारी भीमाशंकर मंदिरात दर्शनासाठी येणार असल्याची माहिती नव्हती.

त्या संदर्भात जिल्हा प्रशासनानेही परवानगी दिलेली नाही. मात्र, मंदिर ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी परवानगी दिली का, याची माहिती घेतली जाईल आणि त्यानुसार कारवाई केली जाईल,'असे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी स्पष्ट केले आहे.



### परवानगीबाबत चौकशी

» खासदार निशिकांत दुबे यांच्या दर्शनाबाबत जिल्हा प्रशासनाला पूर्वकल्पना नव्हती, असे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी स्पष्ट केले. या संदर्भात जिल्हा प्रशासनाकडून कोणतीही अधिकृत परवानगी देण्यात आलेली नाही. मंदिर ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी परवानगी दिली का, याची माहिती घेतली जाईल आणि त्यानुसार पुढील कारवाई केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.